### अभय योजना शोध मोहिम

# दुसऱ्या दिवशी २८ अनाधिकृत नळजोडण्या नियमित

### १२०० मालमत्तांच्या तपासणीअंती १५८ नवीन नळजोडण्या

**नांदेड, दि. २** : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या अभय योजनेतील विशेष शोध मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी (दि. १ नोव्हेंबर) सहा पथकाने भेटी दिलेल्या ११९९ मालमत्तेच्या पाहणीअंती आढळलेल्या ३३ पैकी २८ नळजोडण्या दीड हजार रुपये शुल्क आकारुन नियमित केल्या असून उर्वरित पाचही नळजोडण्या लवकरच नियमित करण्यात येत आहेत. याशिवाय ज्यांच्याकडे नळजोडणी नाही, अशा नळजोडणी नव्या १५८ मालमत्ताधारकांना केवळ पाचशे रुपयात नवीन नळजोडणी देण्यात आली आहे. या मोहिमेला नागरिकांमधूनही भरभरुन प्रतिसाद मिळत असून तात्काळ नवीन नळजोडणी देण्यात येत असल्याने अनेकजण या मोहिमेकडे आकर्षित होत आहेत.

मंगळवारी (दि. १ नोव्हेंबर) क्षेत्रिय कार्यालय क्र. १ शिवाजीनगर अंतर्गत पथकाने भेटी दिलेल्या ४०५ मालमत्तेतील आढळलेल्या ९ अनाधिकृत नळजोडणीधारकांपैकी सहा जोडण्या नियमित केल्या, तर ४२ नवीन नळजोडण्या देण्यात आल्या. क्षेत्रिय कार्यालय क्र. २ अशोकनगर : तपासलेल्या मालमत्ता (१५०), अनाधिकृत आढळलेले व नियमित केलेले नळजोडणीधारक (८), नवीन जोडणी (३५), क्षेत्रिय कार्यालय क्र. ३ इतवारा : तपासलेल्या मालमत्ता (५४), अनाधिकृत जोडण्या (१०), नियमित केलेल्या जोडण्या (८), नवीन नळजोडण्या (१२), क्षेत्रिय कार्यालय क्र. ४ वजीराबाद : तपासलेल्या मालमत्ता (४००), अनाधिकृत आढळलेले व नियमित केलेले नळजोडणीधारक (६), नवीन जोडणी (६), क्षेत्रिय कार्यालय क्र. ५ सिडको : तपासलेल्या मालमत्ता (७०), नवीन जोडणी (३५), क्षेत्रिय कार्यालय क्र. ६ तरोडा : तपासलेल्या मालमत्ता (१२०), नवीन जोडणी (२८).

अभय योजनेअंतर्गत दि. १५ ऑगष्ट ते ३० ऑक्टोबर २०११ दरम्यान मिळालेल्या प्रतिसादाच्या कितीतरी अधिक पटीने या विशेष शोध मोहिमेला प्रतिसाद मिळत असून त्याचे परिणामही चांगले दिसू लागले आहेत. गेल्या दोन दिवसात २७५ नव्या नळजोडण्या देण्यात आल्या असून आढळलेले ४४ अनाधिकृत नळजोडण्या नियमित करण्यात येत आहेत.